**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

जा.क्र.पिसंयो/उसंपिसं/PDMIS पत्रव्यवहार/प्र.क्र.१/५८२/२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५
दिनांक - २८/६/२०१२

**प्रति,**

विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व

**विषयः- सन २०१२-१३ मध्ये ऑनलाईन पी डी एम आय एस संगणक प्रणालीमध्ये किड रोग अहवाल भरणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये आपणांस सूचित करणेत येते की, सन २०१२-१३ साठी खरीप पिकांच्या पेरणीस सर्वत्र सुरुवात होत आहे. राज्यातील खरीप व रब्बी पिकांवर पडणार्या विविध किड रोगांच्या बाबतची माहिती गतवर्षाप्रमाणे या वर्षीही आयुक्तालयास पाठवावयाची आहे. सदर माहिती दोन स्वतंत्र अहवालात द्यावयाची आहे.

**ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे (पी डी एम आय एस) भरावयाचा अहवाल :-**

सन २००७-०८ पासून केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे कीड रोगाची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये पेस्ट डिसीज मॉनिटरिंग इन्फॉरमेशन सिस्टीम (पीडीएमआयएस) द्वारे भरावयाची आहे. सदर प्रणाली **http://pdmis.dacnet.nic.in** या संकेतस्थळावर ऑन लाईन उपलब्ध आहे. सदर संगणक प्रणालीमध्ये मागील चार वर्षे आपण अहवाल भरलेला आहे. सन २०१२-१३ चे अहवाल भरणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) प्रथम **http://pdmis.dacnet.nic.in** या संकेत स्थळावर जावे.

२) संकेत स्थळ उघडल्यावर ज्या आठवडयाचा अहवाल भरावयाचा आहे ती तारीख सिलेक्ट करावी.

३) State - महाराष्ट्र सिलेक्ट करावा. त्यानंतर संगणक प्रणाली उघडणेसाठी पासवर्ड वापरावा. **सदर पासवर्ड कोणत्याही परिस्थितीमध्ये शेअर करु नये व बदलण्यात येवू नये. पासवर्ड साठी जबाबदार अधिकार्याtने या कार्यालयाशी संपर्क साधावा.**

४) त्यानंतर दाखविलेला कोड नंबर बॉक्समध्ये टाईप करुन लॉगइन करावे. किडरोग बाबत माहिती भरणेसाठी विंडो ओपन होईल. सदर प्रपत्रामध्ये पिकनिहाय तसेच किड/रोग निहाय माहिती भरुन ती सेव्ह करावी.

५) सदर अहवाल संगणक प्रणालीद्वारे थेट केंद्रशासनाकडे जात असल्याने बिनचूक व वस्तुनिष्ठ अहवाल भरला जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

http://mahaagri.gov.in/

६) मा. प्रधान सचिव, मा.आयुक्त व कृषि संचालक यांना केंद्रशासनास व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे प्रत्येक शुक्रवारी खते, बियाणे व किड रोग परिस्थिती बाबत सद्यस्थितीचा आढावा द्यावा लागतो. त्यासाठी प्रत्येक गुरुवारी मा. सचिव व मा. आयुक्त यांना सदरचा किडरोगाचा अहवाल सादर करावयाचा आहे. त्यानुसार सदर विषयाचे गांभिर्य लक्षात घेवून अहवाल विहित केलेल्या दिवशीच सादर केले जातील असे पाहावे.

**७) अहवालात भरण्यात येणारी किडरोगाबाबतची माहिती क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत प्राप्त होणार्याककिडरोगाच्या माहितीशी तपासून घ्यावी. तसेच अहवालात भरण्यात येणारे पिकांचे पेरणीक्षेत्र सांख्यिकी विभागाच्या पेरणीक्षेत्राशी जुळते आहे याची खात्री करण्यात यावी.**

८) यास्तव कृषि विकास अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संयुक्त स्वाक्षरीने जिल्हयाचा अहवाल तयार करावा.

९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत किड/रोग अहवाल प्रत्येक गुरुवारपर्यंत संगणक प्रणालीव्दारे भरावयाचा आहे. सदर अहवाल गुरुवारीच संगणकावर भरावयाचा असल्याने जिल्हा कार्यालयाने बुधवार/गुरुवार पर्यंत त्यांचे अधिनस्त असलेल्या SDAO चे अहवाल संकलित करावेत व संकलित केलेला जिल्हयांचा अहवाल गुरुवार अखेरपर्यंत संगणकावर भरण्यात यावा.

१०) संबंधित जिल्हयाचा अहवाल भरला जात आहे याचे पर्यवेक्षण विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाचे राहिल. त्यांनी प्रत्येक गुरुवारपर्यंत याबाबत जिल्हा कार्यालयाकडे पाठपुरावा करावा व गुरुवारी कोणत्याही परिस्थितीत अहवाल संगणक प्रणालीमध्ये भरले जातील याची खात्री करावी.

११) आपल्या जिल्हयातील किडरोगाच्या परिस्थितीबाबत जागरुक राहून किडरोगाच्या स्थितीचा आढावा बैठकांमध्ये घेण्यात यावा.

राज्याचा किड रोग प्रादुर्भावाचा आढावा केंद्र शासनाद्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे दर सप्ताहास होत असल्याने खरीप व रब्बी हंगामातील अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये न चुकता सादर केले जातील याची प्रत्येक स्तरावर दक्षता घेण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
**संचालक**
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-५**

**प्रत,**

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी

२) कृषि विकास अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी

३) उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व) यांना पुढील कार्यवाहीसाठी

http://mahaagri.gov.in/